MHRT010004802023

| | | |
|---|---|---|
| सरकार | | फिर्यादी |
| *विरुद्ध* | | |
| हेमचंद्र भास्कर पाटील | | आरोपी |

## विशेष खटला क्रमांक २५/२०२३ मधील निशाण १३ वरील आदेश

१. प्रस्तुत प्रकरणातील गुन्हा क्र. १३६/२३ रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन एन. डी. पी. एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८(क),२०(ब),(ii),(ब) चे तपासादरम्यान अर्जदार/आरोपीचे ताब्यातील पांढ–या रंगाची होंडा ॲक्टीव्हा (HONDA ACTIVA) रजिस्टर क्र.MH-08-AA-8919, इंजिन नं. JC44E2242616, चेसीस नं. ME4JC447HC8131546 या वर्णनाचे दुचाकी वाहन पोलीसांनी तपासकामी जप्त केलेले आहे.

२. दि. २४.५.२०२३ रोजी जप्त केलेले वाहन पाच महिन्यांहून अधिक काळापासून पोलीस स्टेशनच्या प्रांगणात ठेवलेले आहे. अर्जदाराच्या या वाहनाचे भाग खराब होण्याची शक्यता असल्यामुळे अर्जदाराने वाहन त्याच्या ताब्यात मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे. वाहनाचा तो नोंदणीकृत मालक असल्याबाबत आर.टी.ओ. रत्नागिरी यांनी दिलेला कागद हजर केलेला आहे, स्वतःचे आधारकार्ड हजर केलेले आहे.

३. सरकारपक्षाच्या वतीने नि. १७ प्रमाणे उत्तर दाखल करण्यात आलेले आहे. योग्य त्या अटी व शर्तींवर वाहन देण्यास हरकत नसल्याचे संबंधीत पोलीस निरीक्षक यांनी कळविले.

४. अर्जदाराच्या वतीने वकील श्री. सुहेल शेख तसेच सरकारपक्षाच्या वतीने अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.वाय. ठाकुर यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जदार वर उल्लेखीत दुचाकी वाहनाचा नोंदणीकृत मालक असल्याचे दिसून येत आहे. तपास पूर्ण होवून न्यायालयात खटला दाखल झालेला आहे. आता वरील वाहन पोलीस स्टेशनच्या आवारात पडून राहील्यास त्याचे नुकसान होणार आहे, अर्जदाराला वाहनाची गरज आहे, याकरीता प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. १३ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार श्री. हेमचंद्र भास्कर पाटील यांना पांढ–या रंगाची होंडा ॲक्टीव्हा (HONDA ACTIVA) रजिस्टर क्र.MH-08-AA-8919, इंजिन नं. JC44E2242616, चेसीस नं. ME4JC447HC8131546 या वर्णनाचे दुचाकी वाहन खालील अटी व शर्तींवर ताब्यात देण्यात यावे.

अ) अर्जदाराने रक्कम रुपये १,००,०००/– चा सुपूर्दनामा लिहून संबंधीत रत्नागिरी शहर पोलीस स्टेशनकडे सादर करावा.

ब) अर्जदाराला वाहन देतेवेळेस पंचनामा नोंदवून वाहनाचे फोटो काढून ते या न्यायालयाकडे स्पेशल केस क्र. २५/२३ चे रेकॉर्डकरीता पाठवावेत.

क) वाहनाचा ताबा मिळाल्यावर अर्जदाराने वाहनाचे दृश्य स्वरुपात कुठलाही बदल करु नये.

ड) वाहन कोणालाही विकू नये व हस्तांतरीत करु नये.

इ) अर्जदाराने हे न्यायालय सांगेल त्या वेळी वाहन खटल्याचे कामी न्यायालयापुढे हजर करण्याची हमी दयावी.

सही/-×××

रत्नागिरी. (व्ही.आर.जोशी )

दिनांकः- ०२/११/२०२३ न्यायाधीश,

विशेष न्यायालय,रत्नागिरी.

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Spl. Case No. | :- | 25/2023. Exh.No. 13 |
| Name of Stenographer | :- | Smt.N.N.Desai. |
| Court Name | :- | District and Session Court, Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 02.11.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 02.11.2023 |
| Order uploaded on | :- | 03.11.2023 |